==========================================================

## भाग २

## प्रकरण दुसरे

"परिस्थितीने निर्माण झालेल्या समस्या"

==========================================================

भाग २

## प्रकरण दुसरे

## परिस्थितीने निर्माण झालेल्या समस्या

### रा.रं. बोराडे यांच्या कथेतील दारिद्र्याचे चित्रण आणि सामाजिकता:

### प्रास्ताविक:

"मळणी" आणि "नातीगोती" या रा.रं. बोराडे यांच्या कथासंग्रहातील कथांमधून ग्रामीण जीवनातील दु:खाचेच प्राधान्याने चित्रण झाले आहे. असे दिसून येते. शेती हा ग्रामीण समाजरचनेतील महत्त्वाचा घटक. प्रामुख्याने पावसावर अवलंबून असणारी ही शेती. पाऊस अनियमित असल्याने शेती पिकत नाही. त्यातही खेड्यात रोजंदारीवर काम करणारा मजूर वर्ग अधिक्याने असतो. जर पाऊसच पडला नाही, शेती पिकली नाही तर आपोआपच काम मिळत नाही. उपासमारीची पाळी येते. त्यामुळे दु:खाला सुरुवात होते. भाकरीपासून सर्व प्रश्न सुरु होतात. दारिद्र्य हे त्यांच्या अनेकविध दु:खांचे मूळ आहे. ग्रामीण समाजाचा बहुसंख्य भाग दारिद्र्याने पीडित असतो. दारिद्र्य हा जणू येथील सामाजिकतेचाच एक भाग बनून राहिलेला असतो. अशा दारिद्र्याचे चित्रण बोराडे यांच्या कथांतून कसे केले गेले आहे याचा या प्रकरणात विचार करु.

....

दारिद्र्यामुळे निर्माण होणारा भावनिक दुरावा:

ग्रामीण जीवनातील बहुसंख्य शेतक-यांचे दारिद्र्य अस्पृश्यांच्या दारिद्र्याप्रमाणे विदारक नसते. अन्नावाचून हालहाल करणारे नसते तर तुटवड्याने निर्माण झालेले असते. अन्न असते परंतु कमी. पैसा असतो परंतु अपुरा. त्यामुळे शेतक-याच्या मनाची कुतरओढ चाललेली असते. ह्या अपुरेपणाचा त्रास केवळ माणसाला शारीरिक पातळीवर सोसावा लागतो असे नव्हे. त्याच्या मनाची कुचंबणा होत असते. माणसामाणसांतील वागणे उदारपणाचे, सरळपणाचे, खरेपणाचे राहात नाही. नैसर्गिक भावनांचा कोंडमारा होत असतो. यामुळे निर्माण झालेले दु:ख मनाला कुरतडणारे असते. शेतक-याच्या दु:खाचे हे वैशिष्टय बोराडे यांच्या अनेक कथांतून संयमित कथनशैलीने तितक्याच हळुवारपणे प्रकट झालेले दिसून येते.

रोजगारी म्हणून दुस-याच्या शेतावर काम करणारे शेवंता आणि
(1) शिवराम हे जोडपे "आबाळ" कथेत भेटते. दारिद्र्यामुळे त्यांच्या मनाची कशी कोंडी होते याचे चित्रण या कथेत केले आहे.

शेवंताचा भाऊ आजारी असल्याची खबर तिला कळते. भावाला भेटण्यासाठी ती निघते. जवळ पैसा नाही. रीतीरिवाज मान्य असूनही पैसे नसल्याने शेवंता व तिच्या नव-याच्या मनाचा फार कोंडमारा होतो. याच्या बुडाशी दारिद्र्यच आहे. एवढ्या आर्थिक चणचणीतही ते रीती-रिवाजाला फाटा देत नाहीत. हे ग्रामीण समाजमनाचे वैशिष्टय म्हणावे लागेल. इथे परिस्थिती मात्र उलटीच आहे. शेवंता एकतर्फीच भावावर माया करते आहे असे प्रथमदर्शनी वाटते. तिचा भाऊ तिचे म्हणावे तसे स्वागत करत नाही. ती माहेरी आल्यावर चहा करण्याइतपत साखर

घरात असत नाही. म्हणजे भाऊही दारिद्र्याच्या चिखलात बुडालेला आहे. त्यात हे आजारपण. त्यामुळे तो ही गलितगात्र झालेला आहे.

शेवंता जेव्हा मी दादाला भेटून येते, उद्या मी इथे असणार नाही असे नवऱ्याला सांगते तेव्हा "तु न्हाईस तर तुजा रोजगारबी न्हाई न्हवं का ?"१ असं शिवराम म्हणतो. या ठिकाणी तिच्या भावाच्या आजारपणापेक्षाही तिचा रोजगार जास्त महत्त्वाचा आहे. कारण पोट त्याच्यावरच आहे. "माणूस म्हणजे रोजगाराचे एक जिवंत साधन" हेच समीकरण दारिद्र्याने घालून दिलेले आहे. औषधोपचारासाठी तालुक्याला का गेला नाही असे विचारताच दादा म्हणतो, "आसल्या मामुली रोगाला कोन तालुकान-जिल्हा बगत बसलंय. शिवाय तालुका म्हनलांकी गाडीबैल आले. खरचा-अरचा आला. एवढी उठाठेव करायची हिंमत तरी हाय का आपल्यात ? २

कमळी त्यांची मुलगी. वयाने लहान असूनही ती गुरे राखते. तिचे बालपणही कष्टातच जाते आहे. प्रत्येकजण आपापल्यापरीने मिळविण्याचा प्रयत्न करतो आहे पण चणचण संपत नाही. भावाला साबुदाण्याची खीर खावक्त नाही त्यावेळी ती कमळीला मिळते. तिलाही हवी असते पण मागण्यापेक्षाही आशाळभूतपणे खिरीकडे पहाण्याशिवाय ती काहीच करू शकत नाही. या वयातही तिचे हे "सोसणे" करुणाजनक वाटते. पोटात अन्नाचा कण नसतानाही बहीण मी जेवूनच आले असे खोटेच सांगते. व उपाशीपोटीच परत फिरते. भाऊ आग्रह करतो पण तोही तितक्यास तितकाच. याच्यामुळाशीही दारिद्र्यच.

एका गरीब आजारी भावाच्या समाचारासाठी गेलेली तितक्याच गरीब बहिणीच्या भावनांची किती ओढाताण होते याचे चित्र या कथेत

रंगविले आहे. दारिद्र्य, उपासमार याने माणूस किती गांजला जातो. त्याला रक्ताची नातीही काचू लागतात. जड वाटतात. बहिणीने एक रात्र तरी रहावे असे वाटण्यापेक्षाही तिने परत जावे असेच भावाला वाटते आहे. परिस्थितीच्या विळख्यात नाती गारठू पहात आहेत. इथली शेवंता मायाळू असूनही "बिचारी" होते.

याच पध्दतीने पदरी तीन मुले आणि कपाळी वैधव्य असणाऱ्या यशोदेचे दु:ख "पाझर" कथेत बोराडे चित्रितात. सतत पाठलाग करणारा दुष्काळ जगण्याची घडीच विस्कटतो. त्यात यशोदा गरीब. तिचा भाऊ-ही तिच्याकडे दुर्लक्ष करु लागतो. परिस्थितीने नात्यावर ताण येऊ लागतात. दहा एकर जमीन असल्याने तिला रेशन दुकानातून धान्यही मिळू शकत नाही. सगळी जमीन कोरडवाहू. म्हणजे केवळ जमीन नावावर आहे त्यामुळे रेशनवरील धान्यापासूनही ती वंचित होते. त्यामुळे तिची दोन्हीकडून उपासमार होते. भाकरीपासून सगळ्या समस्यांची सुरुवात होते. पोट कसे भरायचे हाच मूलभूत प्रश्न.

माहेर हक्काचे आहे म्हणून माहेरी येऊन यशोदा आपले दु:ख हलके करु इच्छिते. बहिणीने उसने एक ज्वारीचे पोते मागताच भाऊ पंढरी तोंड फिरवितो. नाती जीवाभावाची असूनही तोंड फिरवितात. वडिलांना आईलाही वाईट वाटते. लेक संकटात आहे खरी. पण दारिद्र्यानेच हे दु:ख तिच्या वाटयाला आणलेले आहे. पण आपणही त्याच परिस्थितीत आहोत. म्हणून कर्त्या मुलाच्या (कारभाऱ्याचा) सल्ला घेणे गरजेचे वाटते. ग्रामीण कुटुंबरचनेमध्ये एकदा सूत्रे कारभाऱ्याच्या हाती गेल्यावर इतरांना त्यात हस्तक्षेप करता येत नाही. परिस्थिती कितीही उग्र असली तरी आईची माया कोरडी होत नाही. यशोदेच्या आईने पंढरीला जे उत्तर दिले ते

मोठे मार्मिक आहे. ती म्हणाते, "तसं कसं म्हनतोस बाबा पंढरी आपल्या दुरडीत एक रोटी असली तरी तिला त्यातली आरधी द्यावी लागंल." ३

आई मुलीला मदत करु इच्छिते. पंढरी कसा तरी चार दोन पायल्या ज्वारी द्यायला तयार होतो. तेव्हामात्र यशोदाची आई चिडते आणि, "चार दोन पायल्या द्यायला ती काय भिकारीन हाय व्हयरं ? ती सत्तची भईन हाय तुझी. भईन म्हणून काई द्यायचं असलं तर दे, नाहीतर न्हाई म्हणून तरी सांग."४ आईला लेकीचे दु:ख बघवत नाही. आधीच मुलगी विधवा, त्यात दुष्काळ, तिला कुणाचा तरी आधार हवाच असे तिला मन:पूर्वक वाटते. यशोदेचा अपेक्षाभंग होतो. पण नाईलाजाने तिला चार पायल्यांचे गाठोडे घेऊन गाडीत बसावे लागते. प्रत्यक्ष भाऊ बहिणीला मदत करु इच्छित नाही. आई-बाप जमेल तेवढी मदत करु इच्छितात. परिस्थितीच्या तडाख्याने, दारिद्र्यामुळे यशोदेला मिळेल ती मदत घेऊन अपमान गिळावा लागतो. भावंडपणा, मातृप्रेम याचे चित्रण बोराडे करतात. अजूनही मायेचा "पाझर" आटलेला नाही हेच बोराडे दाखवू इच्छितात.

दारिद्र्य माणसाला खूप काही शिकविते. प्रामुख्याने सोसायला
शिकविते. "चुंबळ" या कथेतील पुतळा याच दारिद्र्याच्या फटक्याने
(3) असहाय झाली आहे. माहेरी आणि सासरीही काबाडकष्ट करुन मजुरी
करुन जगणारेच सगळे असल्याने नवा पाहुणा माणूस जडच वाटतो.
रोजंदारीवर जिथे आपलेच पोट भागत नाही तिथे इतरांच्या स्वागताला
बळच उरत नाही. त्यात याच्या जोडीला दुष्काळही आहे.

अशा अवघड अवस्थेत एके दिवशी पुतळाच्या सासरहून निरोप येतो. त्यात पुतळाला घेऊन जाण्याविषयी आग्रह असतो. ग्रामीण समाजामध्ये

सणावाराला मुलीला कौतुकाने माहेरी आणले जाते. असेल त्या स्थितीतही गोड-धोड घातले जाते. पण कुठलाच सण, वार नसताना हा निरोप येतो तेव्हा शंका वाटू लागते. पण वडील तात्याबा नेमके हेरतात की,"आगं, दिवस कसले हायीत बगत न्हाईस का ! असल्या दिसात तेवढंच घरातलं खानारं एक तोंड कमी करावं आसं वाटलं आसंल त्यानला." ५

सासरी, माहेरी सगळीकडे सारखीच परिस्थिती आहे. मुलीला माहेरी आणावे तर आपलीच उपासमार चालू आहे. त्यातही आणखी जमेची बाजू म्हणजे तिचा नवरा, सासऱ्याही पैसे कमावितात. त्यामुळे तिकडेच ती नीट जगू शकेल. उगीच तिच्या सासरची मंडळी मुद्दाम तिला इकडे पाठविण्याचा घाट घालीत आहेत असे तात्याबालाही वाटते, "आग ती मानसं लई नंबरी हायीत. अस्या टायमाला घरातलं तेवढं पोट भाईर गेलं तर बगावं आसं वाटलं आसंल त्यानला" हा युक्तिवाद सूचक आहे. दारिद्र्यामुळे आपल्याच घरातली आपलीच माणसेही अडचणीची वाटू लागतात. त्यातून नव्याच समस्या निर्माण होऊ लागतात. मुलीला आहे त्याच स्थितीत सासरी ठेवणेच हितावह आहे यावर शेवटी तात्याबाचे एकमत होते.

परिस्थिती बदलल्यावर नव्याच समस्येला तोंड फुटते. पाऊस पडतो. सुगी होते. लेकीला आणायला तात्याबा जातो. मुलीला माहेरी पाठविण्यासाठी नवऱ्याची नव्हे तर सासरे लिंबाजीरावांची परवानगी घ्यावी लागते. पितृसत्ताक कुटुंबपध्दतीमुळेच हे होते. आम्ही न्या म्हणत होतो तेव्हा तुम्ही नेले नाही आता आम्हीही पाठवायला तयार नाही हेच लिंबाजीराव सुनावतात. "आता मनातलं म्हनताल तर तुम्हाला वाटलं आसंल, आता सुगी आलीया. मिळवायचे दिवस एवढेच हायीत. आता लेकीला आनावं म्हंजी कमविनारे तेवढेच दोन हात घरात येतेत." ६ वास्तविक

तात्याबाचा असा विचार मुळी नसतोच. पण दारिद्र्यापोटी त्याला हे ही बोलणे सोसावे लागते. तात्याबालाही बोलावसं वाटते पण तो बोलत नाही. कारण लेकीला आयुष्यभर याच माणसांमध्ये नांदायचे आहे. तात्याबाची दारिद्र्याने माणूस म्हणूनही किंमत ठेवली नाही. "घरात वावरणारा साप आणि लेकीच्या सासरची माणसं दुखविणं केव्हाही चांगलं नसतं"[७] हे त्यांना पक्कं ठाऊक आहे.

पुतळाची अवस्था चुंबळेसारखीच झाली आहे. सासरच्या दुःखाचे ओझे माहेरच्या डोक्यावर नको म्हणून ती मध्येच चुंबळ होते. सारे सोसते. एक अक्षरही बोलत नाही. बोराडेंनी फार संयमाने तिचे दुःख सांगितले आहे. व्यवहार आणि संस्कार याच्या कात्रीत पुतळा सापडते. दारिद्र्यामुळे हे घडून येते.

बोराडे यांनी दारिद्र्यामुळे निर्माण होणाऱ्या दुःखाचे अनेक प्रकार चित्रित केले आहेत. "नेट" कथेत तात्याबा हा गरीब भाऊ सुंदरा नावाच्या त्याच्याहून बऱ्या स्थितीत असलेल्या बहिणीच्या घरी सून ठरवायला जातो आणि निराश होऊन परततो.

तात्याबाचा मुलगा यंका, बाप लग्न जमवत नाही म्हणून घरातून परागंदा होतो. ग्रामीण समाजामध्ये असे घडणे अप्रतिष्ठेचे मानले जाते. आपल्याच बहिणीची मुलगी लग्नाची आहे म्हणून भाऊ तात्याबा तिला मागणी घालण्यासाठी जातो. तात्याबा दुसऱ्याच्या शेतामध्ये रोजंदारी करतो. त्यामुळे वर्षभर तो मालकाच्या रगाड्यातच असतो. हातात पैसा नाही. कसलीही सत्ता नाही असे त्याचे परस्वाधीन जिणे आहे. बहिणीने विचारताच तो सांगतो, "ताबेदारी हाय न्हवं का दुसऱ्याची. त्यानी जा म्हनील तिथं जावं लागतं आन म्हनील तवा यावं लागतं."[८] या उद्‌गारातही दारिद्र्याचेच दुःख लपले आहे. काहीही झाले तरी "सोसणे" एवढेच त्यांना माहीत.

बहिणाचीची मुलगी लग्नाची असतानाही ती स्वत:च्या मुलीविषयी फारसं बोलत नाही. भावाच्या येण्याने ती आनंदी होते. भावाची काळजी मिटविण्याचा सोपा उपाय तिच्याजवळ आहे तरीही भावाच्या गरीबीचा अंदाज घेऊन ती गप्प बसते. बकुळेला चांगल्या खात्यापित्या घरी जावे ही अपेक्षा कुठल्याही मुलीच्या आई-वडिलांची असणे साहजिक आहे. म्हणून ती भावाला स्पष्टपणे म्हणूनही दाखविते की, "....खुरपं तर आपल्या नशिबाला बांधलेलंच हाय. म्हणून पोरीच्या नशिबात कशाला बांधावं ? आता चारदोनशे रीण हुईल खरं, चार दोन वरसं पोटापाण्याची आबाळ हुईल खरी, पर पोरीची जन्माची आबाळ तरी मिटंल."९ तर बहिणीचा नवरा सुमानराव सांगतात, "तसला एकादा पोरगा बगन्यात आला तुमच्या तर कळवा आमाला. एका औताची बी जमीन असली तरी पुरी आमाला."१० नकळतपणे तात्याबाच्या दारिद्र्यावर हे हल्ले होत रहातात. बहिणा बोलते ते मोकळेपणाने. त्यात भावाला दुखविण्याचा हेतू नाही.

खरी कुचंबणा तात्याबाची होते. मी तुमच्या मुलीला मागणी घालायला आलो आहे हे त्याला सांगवतही नाही. तो गप्प बसतो. मुलाच्या लग्नाचा विषय न काढताच परत फिरतो. बहिणीच्या अपेक्षा आपण पु-या करु शकणार नाही याची खंत त्याच्या मनाला आहे. दारिद्र्य त्याला गप्प करते. त्याचे "नेट" उसने ठरते. दारिद्र्याने त्याची जागा त्याला दाखवून दिली आहे.

## दारिद्र्यामुळे होणारा भावनिक कोंडमारा:

दारिद्र्य माणसाच्या एकंदर जीवनावर विविध प्रकारे परिणाम करीत असते. व्यक्तिच्या भावनांचा विचार केला जात नाही. व्यवहारापुढे मानवी भावनांना गौण स्थान प्राप्त होते. एखादा नवरा, नवरा ही भूमिकाही बजावू शकत नाही. याचे चित्रण "माघारी" कथेत केले आहे.

दारिद्र्याने किसनाला कसे भित्रे आणि अगतिक केले आहे याचे चित्र उभे केले आहे. किसन साधा शेतमजूर. मालकाकडून कर्ज काढून लग्न करतो. परतफेडीसाठी दोन वर्षे राबतो आणि दिवाळसणाला म्हणून त्याचा बायकोला सासरा घेऊन जातो तो तिला परत आणीतच नाही. उलट तिला दुसरा घरोबा करून देण्याच्या गोष्टी करु लागतो. सुगंधा त्याची बायको. लेकीला काम जास्त पडते या सबबाखाली तो तिला नांदवायला पाठवायला तयार नाही.

जावई लेकीला न्यायला आल्यानंतर त्याचे स्वागत करण्याऐवजी त्याच्या पौरुषत्वाविषयी शंका घेतली जाते. हे बोलण्याचे धाडस सासरा तरी का करतो, याची कारणे शोधताना किसनाच्या दारिद्र्यापाशी येऊन थांबावे लागते. रोजगारीने दुस-याच्या शेतात राबणा-या या गरीब फाटक्या माणसाच्या मागे कोण उभा राहील असा सास-याचा गैरसमज असतो. पण घडते केलेच. गावातील प्रतिष्ठीत देशमुख किसनाला मदत करतात. ग्रामीण समाजामध्ये गरीबांना केवळ शारीरिकच नव्हे तर भावनिक संरक्षणही दिले जाते. सासराच जेव्हा विचारतो, "आमच्या लेकीला नवरेपणा दावायची तुमची ताकदच न्हाई तर तिला कस्याला धाडावं नांदायला १ " हा हल्ला अतिशय अनपेक्षित असल्याने तो परतविणे ही किसनाला अवघड होऊन बसते.

देशमुखांना हा प्रकार कळताच ते म्हणतात, तू हे कशाला ऐकून घेतलेस १ पायतले हातात का घेतले नाही १ त्यावर खचलेल्या आवाजात किसना म्हणतो, "गरिबाला पायातलं कोन काढू देतंय मालक १ " १२ या ठिकाणी दारिद्र्य त्याच्या कृतीला मज्जाव करते. इच्छा असूनही प्रतिकार परवडत नाही. सास-याला मुलीचा वंश वाढला नाही याची खंत वाटते. पण देशमुखांच्या खांद्यावरची बंदूक आणि त्याचा जोष पाहून सासरा घाबरतो.

सुगंधा कथेच्या मध्यापर्यंत एकही अक्षर बोलत नाही. तिला नव-याकडे जायचे आहे पण आई-बाप जाऊ देत नाहीत. पण संधी मिळताच ती गुपचूप गाडीत जाऊन बसते. मुलीचा वंश वाढायला तर तो माहेरी राहून कसा वाढेल ? दुसरा घरोबा करण्यामागे थोडेफार पैसे त्याला मिळणार असावेत. याच्या मुळाशीही बापाचे आर्थिक दैन्यच असावे असा निष्कर्ष काढण्याइतपत जागा आहे.

सुगंधा पहिल्यांदाच कथेत बोलते की, "म्या कवा म्हायेराला जानार न्हाई" १३ बायकांना माहेर तर जिवापेक्षाही प्यार. पण परिस्थितीनेच हे तिला बोलायला लावले आहे. सासरा गावक-यांचेही ऐकत नाही. हा प्रश्न गावाच्या प्रतिष्ठेचा होऊन बसतो. योग्य निर्णय असूनही आपल्याच गावच्या माणसानेही मानला नाही तरी त्यासही गावकरी विरोध करतात. हे ग्रामीण समाजमनाचे वैशिष्टय आहे.

कथेच्या उत्तरार्धात देशमुखांचे खरे रूप कळते. "सावणाच्या फेसावानी" हसणारी सुगंधा गंभीर होत जाते. बापूसाहेबांचे तिच्याकडे येणे वाढते. इथे किसनाचे दारिद्र्य त्याला लाचार बनविते. एकदा देशमुख अतिप्रसंग करण्याचा प्रयत्नही करतात. किसना दुबळा ठरतो. नवरा असूनही नवरेपणाचा हक्क गमावून बसतो. दुसरीकडे सुगंधा जिवाचे काही बरे-वाईट करेल याची धास्ती त्याला आहे. एकीकडे अब्रू धोक्यात आहे तर दुसरीकडे न टाकता येणारा दुबळेपणा आहे. अशा दुहेरी पेचात तो सापडतो. शेवटी तिला माहेरी पाठविण्याचा निर्णय तो घेतो. अगतिक झाल्याने तो रडतो. लढू शकत नाही.

दारिद्र्याने माणसाला रीतीरिवाजापासून, माणूसपणापासूनही खाली आणल्याचे काही वेळा दिसते. "देणेकरी" या कथेमध्ये बोराडे यांनी हीच व्यथा मांडली आहे.

पाहुणा हा आदराचा विषय जरूर आहे. पण जर दोन दोन दिवस घरात चूलच पेटत नसेल तर तो संकटच ठरतो. दुष्काळाच्या तीव्र तडाख्याने शकुंतलेचा बाप ज्योतिबा जनावरांना बाजारात विकतो आणि येता येता मुलीच्या सासरला सहज जातो. मुलीची, व्याह्याची भेट, बोलणी व्हावी हाच हेतू असतो. पण व्याही सोनाजी आणि विहीण धनाबाई यांचा गैरसमज असा होतो की एक दिवस पोट बाहेर निघेल म्हणूनच व्याही आला आहे. मुलगा नरसिंग रोजगाराच्या शोधासाठी गेला आहे. प्रत्येकजण भाकरीच्या चिंतेत आहे.

खरा ताण शकुंतलेच्या मनावरच येतो. सासू सुनेच्या हातातली पाहुण्यांची दशम्याची पिशवी हिसकावून घेते. सासरा आणि सासू मिळून पाहुण्यांच्या पिशवीची झडती घेतात. त्यात दशम्या नसतातच. लेकीच्या गावाला येताना पदरी चार दशम्या असतील असे वाटते. पण तिकडेही तीव्र दुष्काळ. पाहुण्यांच्या दशम्यावर झडप घालणारे व्याही-विहीण पाहिले की त्यांच्या अगतिकतेची, असहायतेची कल्पना येते. भाकरीने माणसांना किती वाकविले आहे. दारिद्र्याने माणसाला किती खाली आणले आहे याची कल्पना येते. घरातील भांडणे पाहुणा ऐकेल व निघून जाईल अशा रीतीने होतात. व पाहुणा निघून जातो.

शकुंतला संपूर्ण कथेत दोन-तीन वाक्येच बोलते. तिची स्थिती फार करुणाजनक आहे. एकीकडे सासर व दुसरीकडे माहेर. सगळेच दरिद्री आहेत. "भूक" सगळ्यात महत्त्वाची ठरते आहे. या प्रसंगीही ती सर्व सोसून हाही प्रसंग निभावून नेते. हेच तिचे मोठेपण व कौशल्यही. माणूसपणालाच कमीपणा आणणारी वागणूक इथे दिली जाते. तीही केवळ दारिद्र्यामुळे. मा.ना. कागणे यांनी म्हटले आहे की, "देणेकरी, मुराळी, नातं, हेळसांड, मुरडण, घालमेल" या कथा या नात्यातील पण

केवळ नातं सांगणाऱ्या आहेत. त्यातील अनुभवाची जात गंभीर आहे. त्याचं नातं दु:खाशी आहे. विशेषत: "देणेकरी","घालमेल" या कथा काळजाचा ठाव घेणाऱ्या आहेत. त्या वाचकास अंतर्मुख करतात."१४

दारिद्र्य आणि विवाहविषयक पेच:

स्वत:च्या खानदानीपणाच्या आणि वतनाच्या अवास्तव कल्पना काळानुरूप बदलून न घेतल्यामुळे निर्माण झालेल्या दु:खाच्या कथाही बोराडे लिहितात. याच्या मुळाशीही आर्थिक दारिद्र्य हाच घटक असतो. "लगीन" कथेमध्ये स्वत:च्या मुलाच्या लग्नाची तारांबळ चित्रित केलेली आहे. मुलाचे लग्न ही प्रतिष्ठेची गोष्ट. आर्थिकदृष्टया दारिद्र्य असल्याने वतनदार असूनही व्यंकटरावांकडे मुलाच्या सोयरिकीसाठी कुणी येत नाही. याची खंत त्यांना असते. पण हे कबूल करायला ते तयार नसतात. पण मुलाच्या आईला वास्तवाची जाण असल्याने योग्य वेळी ती स्पष्ट शब्दात सांगते, "काय चाटायची का तुमची निस्ती वतनदारी घिऊन. हातात न्हाई पयसा आन ज्येला त्याला म्हनतं मला वक्सा."१५ यातही मानपानाच्या कल्पना आहेत. अशाही स्थितीत पदराला पदर लागणे, हेही महत्त्वाचे मानले जाते. केवळ तडजोड म्हणूनच मुलाच्या बापाने आपून दोनशे रुपये मुलीच्या बापाला देऊन लग्न ठरविलेले असते.

पाहुणे पहिल्यांदाच येतात तेव्हा घरात साधी सुपारीही नसते. उतरंडीचा एक रुपया काढून मुलाची आई सर्व व्यवस्था करते. वेळप्रसंगी जीव मारून मागे ठेवलेला रुपयाही तिला खर्चावा लागतो. वडिलांच्या लग्नातील कोट-पटका मुलाला घालायला देतात. मुलाला हे आवडत नाही. पण प्रसंग तर साजरा करणे भाग असते. माणसाच्या मूलभूत गरजांचीही पूर्ती होऊ नये असे हे दारिद्र्य! मुलगा या कपडयात "गोंधळ्या" सारखा

7530
A

दिसतो. लग्नाच्या बोलणीतही हाच प्रकार. एवढया विपन्नावस्थेतही लोकांना दाखविण्यासाठी दहा हजार हुंडा मागितला जातो. आपल्या वतनदारीचा हा प्रश्न, प्रतिष्ठेचा केला जातो. शेवटी सातशे रुपयांवर तडजोड होते. पण प्रत्यक्षात आपणाच आतून दोनशे रुपये देऊन लग्न करून घ्यायचे आहे हे मुलाच्या आईला कळताच तिच्या अंगाचा तिळपापड होतो. प्रतिष्ठेसाठी दारिद्र्यावर मात केल्याचे खोटे अवसान आणण्याचा प्रयत्न व्यंकटराव करतात, आणि अधिकच दु:खी होतात. मुलगी फार लहान असते. आई तरीही गप्प बसते. कारण चार लोकात फजिती व्हायला नको. अप्रत्यक्षपणे समाजाचा केवढा धाक असतो हे दिसते. मुलगी पसंत नसूनही, तिचा स्वीकार होतो. "चला देवा, तकदिरात हाय ते सोसलं पायजी,"१६ शेवटी नशिबावर हवाला ठेवण्याशिवाय गत्यंतरच उरत नाही. विहीणींचे भांडण दारिद्र्याचे खरे दर्शन घडविते. त्यांना उघडे करते. "खात्यापित्या दावनीचं जनावर फसवून धरनकुटी बांधाया आनलं."१७ असे उद्गार मुलीची आई काढते. तिच्या मनातली मळमळती बोलते. आणि वस्तुस्थितीचे दर्शन घडविते. द.शं. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे, "लगीन" मधल्या घटनांना कारणीभूत असलेले आर्थिक दारिद्र्य व त्यामधून येणारी तडजोडीची वृत्ती कथेतील वास्तवाचे दर्शन घडवितात".१८

लग्न हा प्रतिष्ठेचा प्रश्न असल्याने कधी आपले दारिद्र्य लपवून, वेळप्रसंगी कर्ज काढून तर कधी कधी बैलांसारख्या उदरनिर्वाहाच्या साधनांवरही गदा येते. "सौदा" कथा याच पध्दतीच्या ताणावाचे चित्र उभे करते.

यदाण्णा आणि किसना हे बाप-लेक. दोन पिढयांमध्ये पडत जाणारे अंतर बोराडे दाखवितात. दारिद्र्य आहेच पण पाहुण्यांना ते दाखवायचे नाही. समाजाला तर मुलाचे लग्न वेळेवरच झाले आहे असे वाटले पाहिजे. यासाठी खूप भावनिक पडझड यदाण्णांना सोसावी लागते. मुलाने

दावणीचे बैल विकून लग्नासाठी उभे रहावे हे त्यांना पटत नाही. पटत नाही असे म्हणण्यापेक्षा ते परवडत नाही. बैल गेले तर शेतीची सगळीच कामे खोळंबून रहातील, पर्यायाने रोजच्या जीवनातच अनेक अडचणी निर्माण होतील. म्हणून ते किसनाचे लग्न एक वर्षाने पुढे ढकलण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. पण मुलगा या बाबतीत बोलू घ्यायलाच तयार नाही. मुलाचा युक्तिवाद असा असतो की मी चाळीस रुपयांची नोकरी धरीन. ते पैसे तसेच ठेवू आणि वर्षाने बैलजोडी घेऊ. पण यदाण्णासारख्या अनुभवी माणसाला हा हिशोब मुळीच पटण्या-सारखा नसतो.

यदाण्णांनी किसनाला सबुरीचा सल्ला दिला तरी तो मानायला तयार नसतो. उलट, "तुमी म्हनलाव म्हणून पाच वरसं थांबलो की. माज्या शिणांच्या पोराजाना दोन दोन लेकरं झाली तरी अजून माज्या लग्नाचा पत्त्या न्हाई. अजून किती दम धरावा म्या ?"[१९] बैल विकू नयेत यासाठी यदाण्णांची जी धडपड आहे त्यातला शेवटचा उपाय म्हणून ते किसनाला फटकारतात. "एवढा कसा लग्नाच्या भरीस पडलास म्हणावं ? लगीन म्हटलं की बापाम्होरं आमची जीभ उचलत न्हवती. आन हितं तर गुडघ्यालाच बाशिंग बांधून बसलास तू!"[२०] या उद्गाराला किसना जे उत्तर देतो त्यातून दोन पिढयांचा संघर्ष, आणि मानापमानाची बदललेली अवस्था लक्षात येते. दारिद्र्याने माणूस नुसताच अगतिक होतो असे नाही तर भांबावतोही. रागावतो. पण त्याचाही काही उपयोग होतोच असे नाही. "कस्याला जीभ उचलंल आण्णा. बायकू म्हंजी काय हे कळायच्या आतच बाप तुमाला बायकू देत व्हता. आन हितं तर गळ्यात दाढी आली तरी अजून आमच्या लग्नाचा पत्ता न्हाई."[२१] हे किसनाचे उत्तर यदाण्णांच्या वयाचाही विचार करीत नाही. वय झाल्यामुळे ते

अगतिक आहेतच. बैल विकणे, शेतीची आबाळ करणे, आतून पाहुण्यांना शंभर रुपये देणे, त्यासाठी बैल कमी किंमतीत विकणे हे त्यांना भावत नाही. पण ते काही करुही शकत नाहीत. वु.शं. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे, "खेडुतांचे सर्वात मोठे दु:ख म्हणजे त्यांचे दारिद्र्य. दारिद्र्य त्यांच्या पाचवीला पूजलेले अल्या-मुळे त्याबाबतीतही त्यांच्या वृत्ती तीव्र रहात नाहीत. दारिद्र्य अंगवळणी पडते आणि माणसे जीवनाशी तडजोड स्वीकारुन, मृत्यूची वाट पहात जीवन जगतात आणि म्हणूनच अशा व्यक्तींच्या जीवनातील दु:खाचे चित्रण अतिशय कठीण असते. या दु:खाची सूक्ष्मता टिपून घेण्यासाठी फारच संवेदनाक्षम मनाची गरज असते. संवेदनक्षमतेबरोबरच लेखकाजवळ अलिप्त-पणाचाही गुण असावा लागतो."२२

सारांश:

दारिद्र्य हा जणू ग्रामीण जीवनातील सामाजिकतेचा एक भाग बनून राहिलेला असतो. दारिद्र्याने माणसाच्या वर्तनावर कोणता सामाजिक परिणाम होतो याचा विचार येथे केलेला आहे.

रा.रं. बोराडे यांच्या "मळणी" संग्रहातील "आबाळ", "पाझर", "चुंबळ", "नेट", "माघारी", "लगीन", "सौदा" व "नातीगोती" या संग्रहातील "देणेकरी" या कथांमधून ग्रामीण जीवनातील दारिद्र्याने निर्माण होणारा भावनिक दुरावा, भावनिक कोंडमारा आणि विवाह-विषयक पेच याचे दर्शन घडविलेले आहे. बोराडे यांनी अत्यंत संवेदनाशील मनाने दु:खाच्या विविध त-हा टिपलेल्या आहेत. व त्यामुळे विपर्यस्त झालेले भावसंबंध यांचे चित्रण केल्याचे दिसून येते.

आपल्या गरीब भावाच्या आजारपणात त्याला भेटायला जाणारी शेवंता "आबाळ" कथेत दिसते. जवळचे पैसे खर्च करून, आपला रोजगार बुडवून, पायी चालत जाऊन, उपाशीपोटीच परत फिरते. बहिण आणि भाऊ दोघेही दारिद्र्याने विकल झाल्यामुळेच त्यांच्यात भावनिक दुरावा निर्माण होतो. तर गरिबी आणि वैधव्य असे दुहेरी दु:ख भोगणारी, पदरी तीन मुले असणारी गरीब बहिण "पाझर" कथेत भेटते. भावाला ती धान्य मागते. पण त्याच्या काळजाला पाझर फुटत नाही. घरात बरीच वादावादी होऊन शेवटी चार पायल्या ज्वारी उदारपणे द्यायला भाऊ तयार होतो. तोही नाखुषीने. आई-मुलगी, भाऊ-बहिण ही नातीही दारिद्र्याने गलितगात्र होतात.

वडील घरी येऊनही त्यांच्याशी एक शब्दही बोलू न शकणारी पुतळा "चुंबळ" मध्ये भेटते. वडील माहेरी न्यायला आलेले आहेत. तिलाही जायचे असते, पण सासरा हे घडू देत नाही. स्त्री ही रोजगाराचे एक साधन आहे एवढीच तिची ह्या घरातली किंमत असते. दारिद्र्यामुळे बहिणी-च्या मुलीला मागणी न घालणारा गरीब भाऊ "नेट" मध्ये भेटतो आणि आपण उदास होऊन जातो. मालकाचे कर्ज काढून लग्न करणाऱ्या किसनाला बायको आपली असूनही नवरेपणाचा हक्क बजावता येत नाही. सासराच त्याला दु:खी करतो. दुसऱ्याबाजूला देशमुखासारख्या वाईट नजरेच्या माणसाची शिकार आपली बायको होऊ नये म्हणून तो नाईला-जाने तिला पुन्हा माहेरी पाठवितो. हे दु:खही दारिद्र्यापोटीच जन्मते. व त्याच्या असहायतेचा गैरफायदा घेतला जातो. "माघारी" कथेतले हे दु:ख जीवघेणे आहे. आपण वतनदार आहोत म्हणून हट्ट धरणारा बाप मुलाच्या लग्नाच्या बाबतीत आतल्या अंगाने पैसे देऊन लग्न उरकतो. "लगीन" मधल्या या दु:खाने वतनदारीच्या पोकळ डामडौलाचे पितळ उघडे

पडते. दारिद्र्य हे करायला भाग पाडते. दावणीतली बैलजोडी विकून मुलगा लग्नाला तयार झाल्याचे पाहून कष्टी होणारा यदाण्णा "सौदा" मध्ये भेटतो. दोन पिढ्यातील अंतर बोराडे सहजपणे दाखवितात. कथा अधिक वास्तववादी होत जाते. बैल विकून किसना आधीच्या दारिद्र्यात भर घालणार हे यदाण्णांना जाणवते पण ते असहाय असतात. पाहुण्यांची दशम्याची पिशवी तपासणारे व्याही-विहीण "देणेकरी" कथेमध्ये [illegible]लेचे विदारक चित्र दाखवितात. भाकरीने, दारिद्र्याने माणसाला कसे लाचार केले हेही दिसते.

दरवर्षी लांबत जाणारा लहरी पाऊस, दुष्काळ, रोजगारीची चणचण, घरातील वाढते तणाव-भांडणे, यामुळे ही माणसे मेटाकुटीला आली आहेत. दारिद्र्याच्या मगरमिठीत सापडली आहेत. दारिद्र्य मानसिकदृष्टया दुरावा निर्माण करायला कारणीभूत ठरते. माणसामाणसातील वागणे म्हणजेच सामाजिकता. तेही बदलते. दारिद्र्याने माणसे वाकतात. परिस्थितीच्या दबावाने माणसे अशी वागतात. त्यात वैरभाव नसतो. त्यामुळेच यातली अगतिकता मनाला फार उदास करते.

## - संदर्भ -


१ बोराडे रा.रं. "आबाळ", मळणी मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९८३, पृष्ठ ९०.

२ तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ९२.

३ बोराडे रा.रं. "पाझर" मळणी मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९८३, पृष्ठ १.

४ तत्रैव, तत्रैव, पृष्ठ १२५.

५ बोराडे रा.रं. "चुंबळ" "मळणी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९८३, पृष्ठ १.

६. तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ५.

७ तत्रैव, तत्रैव

८ बोराडे रा.रं. "नेट", मळणी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९८३, पृष्ठ ९९.

९ तत्रैव, तत्रैव, पृष्ठ १०१.

१० तत्रैव, तत्रैव, पृष्ठ १०२.

११ बोराडे रा.रं. "माघारी", मळणी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९८३, पृष्ठ ४१.

१२ तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ४२.

१३ तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ४८.

१४ कागणे मा.ना. "नातीगोती: एक टिपण" प्रतिष्ठान, औरंगाबाद, जुलै-ऑगष्ट, ७७, पृष्ठ १४.

१५. बोराडे रा.रं. "लगीन", मळणी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९८३, पृष्ठ २५-२६.

| | | |
|---|---|---|
| १६ | तत्रैव, | तत्रैव, पृष्ठ ३२. |
| १७ | तत्रैव, | तत्रैव, पृष्ठ ३४. |
| १८ | कुलकर्णी द्.शं. | "रा.रं.बोराडे यांची कथा", प्रतिष्ठान, औरंगाबाद, फेब्रुवारी, १९६८, पृष्ठ १३. |
| १९ | बोराडे रा.रं. | "सौदा", मळणी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९८३, पृष्ठ १४४. |
| २० | तत्रैव, | तत्रैव, पृष्ठ १४९. |
| २१ | तत्रैव, | तत्रैव, |
| २२ | कुलकर्णी द्.शं. | "रा.रं. बोराडे यांची कथा", प्रतिष्ठान, औरंगाबाद, फेब्रुवारी, १९६८, पृष्ठ ११. |